# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १७१ वा ❑ शनिवार दि.२३ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## बैल पोळा आणि तान्हा पोळा : बदलते स्वरूप

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

भारत हा कृषिप्रधान देश असून महाराष्ट्रात बैलाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी श्रावण अमावस्या किंवा सोमवती अमावस्येला बैल पोळा हा सण साजरा करण्यात येतोय. आजच्या दिवशी बैलांना न्हाऊ माखू घालून त्यांना गोड पुरणपोळीचे जेवण घातल्यानंतर गावातील घरोघरी नेलं जातं आहे. महाराष्ट्रातील विदर्भात बैलपोळासह अजून एक अनेक वर्षांची परंपरा आजही पाळली जात आहे. विदर्भात तान्हा पोळा साजरा करण्यात येतो. बैल पोळ्याचा दुसऱ्या दिवशी तान्हा पोळाचा उत्साह असतो.

तान्हा पोळा हा विदर्भातील, विशेषतः नागपूर व परिसरातील एक खास सण आहे, जो बैलपोळ्याच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. या दिवशी लहान मुले लाकडी बैलांना रंगीबेरंगी साहित्याने सजवतात आणि आपल्या हौसेसाठी त्यांची मिरवणूक काढतात. शेतकऱ्यांनी शेतीच्या कामासाठी महत्त्वाचे असलेल्या बैलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी या उद्देशाने, नागपूरचे दुसरे राजे रघुजी महाराज भोसले यांनी १७८९ मध्ये या परंपरेची सुरुवात केली होती.

विदर्भात बैल पोळाला मोठा पोळा आणि दुसऱ्या दिवशी साजरा होणारा तो तान्हा पोळा असतो. या दिवशी लहान मुले आपआपल्या लाकडी बैलाला सजवतात. त्यानंतर एखाद्या जवळच्या मंदिरात किंवा मैदानावर हा तान्हा पोळा भरवल्या जातो. तो परिसर फुगे, तोरण, पताका लावुन सजविल्या जातो.

विदर्भातील सिंदी रेल्वे येथील तान्हा पोळा प्रसिद्ध आहे. या पोळ्याला तब्बल १४१ वर्षांची परंपरा आहे.

सिंदी शहराला 'पोळा सिटी' अशी नवी ओळख निर्माण होत आहे. याची प्रचिती म्हणून बाजारचौकात नंदीचा पुतळा यावर्षी बसविण्यात आला आहे.नगर पालिकेच्यावतीने आयोजित या पोळ्यात पोलीस प्रशासन, महावितरण कर्मचाऱ्यांकडून चोख व्यवस्था ठेवली जाते. हा ऐतिहासिक पोळा पाहण्यासाठी सिंदीवासीय सर्वांना आग्रहाचे निमंत्रण देतात. या दिवशी गावात प्रत्येक घरी पाहुणा हा सोहळा पाहण्यासाठी हजर असतो.सिंदी शहराला येते जत्रेचे स्वरूपपोळा सणाची एक महिन्यांपासून आतुरतेने सिंदीवासी वाट पाहतात.

पोळा सण प्रामुख्याने छत्तीसगड, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि तेलंगणा या भारतीय राज्यांमध्ये साजरा केला जातो. हा सण ग्रामीण जीवनशैली, शेती आणि पशुपालनाशी खोलवर जोडलेला आहे. पोळा सणाचे विशेषतः शेतकरी आणि गावकऱ्यांसाठी विशेष महत्त्व आहे, कारण या काळात बैलांची पूजा केली जाते, जे शेतीच्या कामात महत्त्वाची भूमिका बजावतात.


आधुनिकतेकडे वाटचाल करणाऱ्या समाजातून पारंपारिकता दूर होत चालली आहे. पोळा दरम्यानही असेच दृश्य दिसून आले. पूर्वी पोळा सणात मुले मातीच्या खेळण्यांशी खेळताना दिसायची. पण या आधुनिक युगात टीव्ही आणि मोबाईलमुळे मुले मातीच्या खेळण्यांपासून दूर गेली आहेत.

गेल्या १० वर्षांच्या तुलनेत आता मातीच्या खेळण्यांच्या विक्रीत घट झाली आहे. मातीच्या खेळण्यांच्या विक्रीत जवळपास ७० टक्क्यांनी घट झाली आहे. यामुळे या व्यवसायाशी संबंधित लोकांनी खेळण्यांचे उत्पादनही कमी केले आहे. यामुळे पोळा सणात मातीच्या खेळण्यांशी खेळण्याची परंपराही संपुष्टात येत आहे. भाद्रपद महिन्याच्या अमावस्येच्या दिवशी साजरा केला जाणारा पोळा सण छत्तीसगडच्या स्थानिक सणांमध्ये एक विशेष स्थान आहे. हरेली सणानंतर, लोक पोळा सणाची आतुरतेने वाट पाहतात. पोळा सणाचे महिला, पुरुष आणि मुलांसाठी वेगळे महत्त्व आहे. या सणात शेतकरी शेतीत मदत करणाऱ्या बैलांना सजवतात आणि त्यांची पूजा करतात आणि मुले मातीपासून बनवलेल्या बैलांचा आणि खेळण्यांचा आस्वाद घेतात. सणाच्या निमित्ताने घरांमध्ये अनेक प्रकारचे पदार्थ देखील तयार केले जातात. या दिवशी गावात बैलांच्या शर्यतीचेही आयोजन केले जाते आणि विजेत्या बैल जोडीच्या मालकाला बक्षीस दिले जाते. हा उत्सव केवळ शेती आणि पशुपालनाचे महत्त्व अधोरेखित करत नाही तर सामाजिक एकता आणि सामूहिकतेला प्रोत्साहन देतो. पोळा हा सण छत्तीसगडच्या ग्रामीण समाजातील एक महत्त्वाचा सांस्कृतिक वारसा आहे, जो येणाऱ्या पिढ्यांना आपल्या परंपरा आणि मूल्यांशी जोडतो. अशाप्रकारे, पोळासारखे सण केवळ आपला सांस्कृतिक वारसा जिवंत ठेवत नाहीत तर ते आपल्याला पर्यावरण आणि जैवविविधतेप्रती असलेल्या आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देतात. या सणाच्या माध्यमातून आपल्याला आपले पारंपारिक ज्ञान आणि पद्धती जपण्याची प्रेरणा मिळते, जे आपल्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. जैवविविधतेचे संवर्धन हे केवळ सरकार आणि संघटनांचे काम नाही तर ते प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे आणि पोळासारखे सण आपल्याला या दिशेने एकत्रितपणे पुढे जाण्यास प्रेरित करतात.


### आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.



# बी.डी.कुलकर्णी यांच्या ग्रंथांचे प्रकाशन




**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** – पुणे येथील जिल्हा न्यायाधीश बंडोपंत दि.कुलकर्णी यांच्या मुक्तांची अभंगवाट व ज्ञाना तू का जनी ? निळा नामी गोरा! या दोन ग्रंथांचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ सदानंद मोरे, बाँबे उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन.जे.जमादार, पुणे जिल्हा प्रमुख न्यायाधीश एम.के. महाजन यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य साहित्य परिषद, पुणे येथे संपन्न झाले.या ग्रंथांवर डॉ सदानंद मोरे व डॉ. दत्तात्रय डुंबरे यांनी भाष्य केले. डॉ मोरे यांनी न्यायाधीशांच्या मराठी साहित्यातील लेखन परंपरेचा संपूर्ण आढावा घेतला.त्यासोबत बी.डी. कुलकर्णी यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये विदीत केली. डॉ. दत्तात्रय डुंबरे म्हणाले की, ''अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी। ही कुलकर्णी यांच्या लेखनामागची मूळ प्रेरणा आहे. जात, धर्म, पंथ, वर्ण, वर्ग यांना ते अप्रमाण मानतात. आत्मा हाच ईश्वर मानतात त्यामुळे त्यांच्या लेखनातून संतांच्या समतेच्या विचारांची आपोआप मांडणी होते.'' न्या.जमादार यांनी बी.डी.कुलकर्णी हे आपले वर्गमित्र असल्याचे सांगून कुलकर्णींच्या लेखनप्रवासावर भाष्य केले. आध्यात्मिक बैठक असेल तर न्यायदानाचे काम सुकर होते असेही ते म्हणाले. पुणे जिल्हा प्रमुख न्यायाधीश एम.के. महाजन यांनी संतविचारांची आवश्यकता मानवकल्याणासाठी कशी उपयुक्त आहे,याविषयी विचार मांडले. याशिवाय बी.डी.कुलकर्णी यांचे चिंतन हे मूलगामी असून विचारप्रवृत्त करणारे असल्याचेही नमूद केले. डॉ. जगन्नाथ पाटील यांनी आपल्या भाषणातून कुलकर्णींच्या लेखनप्रवासाला शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी बी.डी.कुलकर्णी यांनी लेखनामागची भूमिका प्रगट केली. कार्यक्रमाचे प्रास्तविक अनुबंध प्रकाशनचे अनिल कुलकर्णी यांनी केले, तर आभार संजय पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपक डोंगरे व आशिष कंकाळ यांनी केले.

# भारत-चीन मैत्रीचा वर्धिष्णू आलेख



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

भारत-चीन मैत्रीसंबंधांचा आलेख गेल्या काही दशकांत प्रथमच मैत्रीपूर्ण आणि परस्पर हितवर्धक सहकार्यामुळे यशाच्या चढत्या आलेखबिंदूवर पोहोचला आहे. भारतीय मुत्सद्दी अजित डोभाल यांनी या सूत्रसंबंधांचे वर्णन ''अपवर्ड ट्रेंड'' असे यथार्थ शब्दात केले आहे. वांगवी यांची भारतभेट ही खरोखरच निर्णायक आणि परस्पर हितवर्धक ठरली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर टेरिफ लादल्यानंतर भारताची व्यूहरचना ही रशिया-चीन यांच्याशी असलेले संबंध सुधारण्याच्या दिशेने आखली जात आहे. भू-राजनैतिक दृष्टीने विचार करता वांगवी यांची ही भेट खरोखरच एक नवे वळण म्हटली पाहिजे. ट्रम्प यांच्या बॉम्बला भारताने जसे ब्रह्मास्त्राने सफल उत्तर दिले आहे, तसेच आता रशिया व चीनबरोबर मैत्री करून भारताने अमेरिकेविरुद्ध एक प्रभावी फळी पर्यायी शक्ती म्हणून संघटित करण्यास सुरुवात केली आहे. या दृष्टीने वांगवी यांच्या भेटीची फलिते लक्षात घेण्यासारखी आहेत.

**जय शंकर यांची त्रिसूत्री**

भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी भारत-चीन संबंधास स्थैर्य देण्यासाठी, परस्पर सहकार्याची गती वाढवण्यासाठी तीन आत्मसंबंधांवर भर दिला आहे. परस्परांविषयी सन्मान, आदरभाव तसेच संवेदनशीलता आणि परस्पर हितांचे संवर्धन या तीन तत्त्वावर आधारित ही मैत्री चिरकाल टिकणारी आणि तेवढीच सदाबहार राहू शकते. आपला सिद्धांत विकसित करताना जयशंकर यांनी असे म्हटले आहे की, मतभेदांचे रूपांतर संघर्षात होऊ नये. स्पर्धाही निरोगी असावी, ती भांडणाचे कारण ठरू नये ही दोन मूलभूत तत्वे जर उभयतांनी काळजीपूर्वक पाळली तर मैत्रीचा भाव खरोखर रचनात्मक आणि सकारात्मक पातळीवर पोहोचू शकतो, हे सूत्र त्यांनी मागील बीजिंग दौऱ्याच्या वेळी प्रभावीपणे मांडले आणि अजित डोभाल यांनी या सूत्राचा व्यत्यास मांडून दोन्ही देशांतील परस्पर सहकार्याची समीकरणे संपूर्णपणे बदलून टाकली आहेत. भारताचे परराष्ट्रमंत्री जय शंकर हे अभ्यासू आणि प्रतिभाशाली संशोधक आहेत. प्रत्येक पातळीवर ते नवे सिद्धांत मांडतात व ते क्रुतीमध्ये उतरवितात.

**भेटीचे ऐतिहासिक महत्त्व**

वांगवी यांच्या भारतभेटीचे ऐतिहासिक महत्त्व असे आहे की, गलवान खोऱ्यातील संघर्ष २०२० मध्ये झाला. त्यानंतर चिनी मुत्सद्यांची ही पहिली भारतभेट आहे. विशेषतः ट्रम्प यांच्या टेरिफ आघातानंतर बदललेल्या वातावरणात या भेटीला महत्त्व होते. जय शंकर यांनी मागे बीजिंगचा दौरा केला. त्यानंतर बरेच वातावरण निवळले. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एस. सी. ओ. म्हणजे शांघाय सहकार्य परिषदेच्या बैठकीसाठी चीनमध्ये उपस्थित राहण्यास संमती दर्शविली आहे. उभय राष्ट्रांतील सीमाप्रश्न तसेच अंतर्गत व्यापाराला प्रोत्साहन देण्याच्या योजना, विमानसेवा आणि व्हिसा नियमांचे शिथलीकरण या सर्व बाबतीत या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.भारत आणि




चीनदरम्यान सीमा प्रश्नांवर ही २४ वी बैठक होती. अजित डोभाल यांच्या चीनभेटीनंतर दोन्ही देशांत सीमेवर शांतता आहे आणि वर्षभरात सीमेवर निर्माण झालेली शांतता आणि स्थैर्य यामुळे या बैठकीला सकारात्मकतेचे संदर्भ प्राप्त झाले आहेत. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने आणि चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या दोन्ही पत्रकांमध्ये परस्पर विकास व भागीदारीवर भर देण्यात आला आहे, ही गोष्ट अधोरेखित केली पाहिजे.

**मुख्य फलिते कोणती ?**

दि. १८ व १९ ऑगस्ट २०२५ रोजी चीनचे परराष्ट्रमंत्री आणि पॉलिट ब्युरोचे सदस्य वांगवी यांच्या भारतभेटीची मुख्य फलिते कोणती असतील, तर त्यामध्ये सीमा प्रश्नांवरील २४ व्या फेरीतील चर्चे प्रमाणेच परस्पर व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी घेतलेले काही निर्णय महत्त्वाचे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शी जीनिपिंग यांच्यात मागील वर्षी ऑक्टोबरमध्ये कझान येथे झालेल्या शिखर परिषदेत दोन्ही देशांत सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने काही पाऊले टाकण्यात आली होती. आता ती खरोखर कृतीमध्ये येत आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांच्या चीनभेटीसाठी पोषक असे उत्साहवर्धक वातावरण तयार करण्यासाठी ही चिनी परराष्ट्र मंत्र्यांची भारतभेट वरदान ठरली आहे. चिनी परराष्ट्रमंत्री वांगवी यांनी वैयक्तिक प्रतिसाद दिला आणि ठाम पाऊले टाकल्यामुळे हे शक्य झाले या शब्दात डोभाल यांनी त्यांचे कौतुक केले, तर वांगवी यांनीसुद्धा उलट पक्षी डोभाल यांच्या प्रतिसादाचा विशेष उल्लेख केला. वांगी यांच्या भारतभेटीमुळे उभय राष्ट्रांचे संबंध मजबूत होण्यासाठी एक रचनात्मक चौकट विकसित करण्यात आली आहे आणि ही चौकट जशी भक्कम होईल, तसे संबंध अधिक सुधारले जातील. ऑक्टोबर २०२४ मध्ये दोन्ही देशांनी सीमेवरील सैन्य मागे घेण्याचा निर्णय घेतला आणि हळूहळू ही भूमिका प्रत्यक्षात कृतीमध्ये आणण्यात आली.

व्यापाराच्या आघाडीवर चीनने भारताला खते, दुर्मिळ खनिजे, मॅग्नेट आणि टनेल खोदणारी यंत्रसामग्री पुरविण्याचे मान्य केले आहे, हे एक सकारात्मक पाऊल आहे. शिवाय बऱ्याच काळापासून थांबलेला भारत-चीन भूमिपातळीवरचा व्यापार पुन्हा खुला होत आहे. प्रामुख्याने सीमेवरील तीन प्रमुख खिंडीतून हा व्यापार पुन्हा सुरू होईल. त्यामध्ये नाथूला तसेच शिफ्ट केला आणि लीपुलेख या तीन खिंडींवरून भारत व चीनमधील व्यापार पुन्हा सुरू होईल, शिवाय दोन्ही देशांतील विमान सेवा आणि व्हिसा नियमसुद्धा सुलभ करण्यात येणार आहेत. **(क्रमशः)**

## वास्तुशास्त्र पेंटिंग

### लघुलेख - 24



'वृश्चिक राशी नंतर 'धनु राशीच्या व्यक्तीं साठी आवश्यक असलेल्या 'वास्तुशास्त्र पेंटींग' मध्ये कोणकोणत्या घटकांचा अंतर्भाव असतो, त्या बद्दल आपण जाणून घेवूयात.

धनु राशीच्या व्यक्ती हया सात्विक प्रवृत्तीच्या जरी असल्या तरी यांना राग, संताप फार लवकर येतो, शीघ्रकोपी असणाऱ्या या व्यक्ती केवळ कांही क्षणांच्या संतापामूळे, साऱ्या लाभांपासून वंचित राहण्याच्या नामुष्कीचे बळी पडतात. 'अग्नी तत्त्वाचीच ही रास असल्याने आणि पुरुष प्रधान राशी असल्याने कामे करण्यातील पुढारपण जपणाऱ्या व्यक्ती या राशीच्या असतात. या राशीचा आकार आपण बघितला तर शरीर प्राण्याचे आणि वरचा भाग मानवाकृतीचा आहे. म्हणून कधीकधी अशा व्यक्ती प्राण्या सारख्याही वागतात. यांच्या स्वभावाचा अंदाज बांधणं दुरापास्त होऊन बसतं. राशीस्वामी 'गुरु' महाराज असल्याने 'सात्विक' भाव जपण्याचा यांचा प्रयत्न असतो. 'पिवळा 'रंग या राशीच्या जातकांसाठी लाभदायक ठरतो. 'मूळ' आणि 'पूर्वाषाढा' या नक्षत्रांवर जन्म झालेल्या व्यक्तींचीही 'आराध्य वृक्ष' आहेत, अनुक्रमे 'राळ' आणि 'वेत' ही ती आहेत. यांचा स्वामी अर्थात नक्षत्र देवता 'निऋत्ती' आणि उदक (आप) आहेत.

ही सारी माहिती मिळवल्या नंतर सदर व्यक्तीं मधील राशींच्या दोषांवर उपाय शोधावा लागतो, आयुर्वेदात, एखाद्या औषधांवर 'अपान' शोधले जाते. किंवा ॲलोपॅथी मध्ये कांही औषधींवर 'ॲंटासिड' दिले जाते. म्हणजे 'अपान' किंवा 'ॲंटासिड' मुळे ती ती औषधे पचवण्या साठीची शक्ती प्राप्त होते.

या 'धनु' राशीचेही तसेच आहे. विक्षिप्तपणा किंवा अचानक श्वापदा सारखं वागणं, प्रसंगी 'गुन्हा सदृश' एखादी कृती, हातून घडणं आणि अशा प्रकारचे बरेच कांही... या व्याल' स्वरूप राशीचे गुणधर्म असतात. त्यामुळे धाडस, गुरुंचा आशिर्वाद, सात्विकता या सद्गुणावर, विक्षिप्तपणा आणि अतिरेकी शिघ्रकोपी स्वभावामुळे सांभाव्य प्रगतीवर पाणी फिरते.

अशा क्लिष्ट प्रसंगी, या राशीच्या जातकांना 'वास्तुशास्त्र पेंटींग' त्यांच्या राहत्या वास्तुमध्ये ठेवले तर मात्र, दूर पळणाऱ्या संभाव्य लाभाची- यशाची व्दारे उघडायला मदत होतेच.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

भरताराच्या शेजारी
काय बसायची लाज ?
चंदनशेल्याची
सावली गहीरेबाज ॥२२१॥

दुबळ्या भरताराला
नार करे अरे - तुरे
बाप हिचा न सोईचा
माय हिची मेंढ्या चारे ॥२२२॥

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# लोकमाता अहिल्याबाई होळकर - भाग २




ज्योतिर्मय साहित्य

अहिल्याबाईंची आपल्या प्रजेसाठी जी कररचना ठरवून दिली ती उल्लखेनीय आणि वैशिट्यपूर्ण होती. कोणावरही अति भार पडणार नाही अशा प्रकारची ही कररचना होती. पूर्वीचे राजे महाराजे प्रजेचे करांच्या रूपाने प्रजेचे शोषण करीत. या मनमानीला त्यांनी चाप लावला. त्यांची कररचना इतकी उत्कृष्ट आणि आदर्श होती की पुढे इंग्रजांनीही आपले राज्य चालवताना त्यांच्या कररचनेचा आधार घेतला. अहिल्यादेवींच्या कल्याणकारी राज्यात प्रत्येक व्यक्तीच्या जीवित-वित्ताची हमी घेतली जाई. त्यासाठी त्या स्वतः दररोज दरबारात उपस्थित असत. त्यांच्यापर्यंत आलेल्या तक्रारींचा स्वतः न्यायनिवाडा करत. एखाद्या गोष्टीवर अधिक विचार करावासा वाटला तर ते प्रकरण न्यायखात्याकडे विचारार्थ पाठवून देत.



अहिल्याबाईंच्या विचारसरणीचं मूळ अध्यात्मात असलं तरी त्या कर्मयोगी होत्या. धर्म म्हणजे दया, समता आणि सेवा हा त्यांचा दृढ विश्वास होता. त्यांनी कोणत्याही पंथ, जात, वा समाजात दुजाभाव केला नाही. सर्व धर्मांना समान वागणूक देणं, हा त्यांच्या नीतीचा पाया होता. त्यांचे धार्मिक कार्य केवळ कर्मकांडापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी मंदिरांमध्ये सर्व जातींचा प्रवेश सुलभ केला. गरीब यात्रेकरूंसाठी अन्नछत्रं सुरू केली. त्या म्हणायच्या "ईश्वर सर्वांचा आहे. त्याचं दर्शन केवळ श्रीमंत वा ब्राह्मणालाच मिळावं, हे अयोग्य." त्यानंतर त्यांच्या सामाजिक कार्यात शुद्ध पाणी, अन्नधान्याचा साठा, आपत्ती व्यवस्थापन ( दुष्काळ, पूर इ. ) यासाठी वेगळं नियोजन होतं. त्या काळात कोणतीही नैसर्गिक आपत्ती आली, तरी अहिल्याबाई तत्काळ मदतीसाठी योजना अंमलात आणत. त्यांच्या काळात देशभर मंदिरे, धर्मशाळा, पाणीवाटपाची ठिकाणं, अन्नछत्रं उभारली गेली. त्यांनी काशी, प्रयाग, रामेश्वर, बद्रीनाथ, द्वारका, सोमनाथ, गंगा घाट, तुळजापूर, पंढरपूर, त्र्यंबकेश्वर अशा अनेक पवित्र स्थळी घाट, मंदिरांचे जीर्णोद्धार आणि नूतनीकरण केलं. त्यांचे लोकसेवेचे प्रचंड कार्य आजही भारावून टाकणारे आहे. आजच्या काळात आपण अहिल्याबाई होळकर यांचं कार्य केवळ इतिहासापुरतं मर्यादित न ठेवता, त्यातून प्रेरणा घेणं अत्यंत गरजेचं आहे. विशेषतः जेव्हा आजच्या नेत्यांकडून पारदर्शकता, न्याय, आणि प्रजेविषयी संवेदनशीलता हरवत चालली आहे, आज समाजात जातीयता, धर्मांधता, लिंगभेद वाढताना दिसतो. याला अहिल्याबाईंच्या समतेच्या तत्वांनी उत्तर देता येईल. अहिल्याबाईंनी जात पात, धर्मापलीकडे जाऊन माणुसकीला केंद्रस्थानी ठेवलं. त्यांची ही समानतेची शिकवण आजही उपयोगी पडणारी आहे. त्यांचे प्रशासन, त्यांच्या मूल्याधिष्ठित निर्णयप्रक्रिया, त्यांच्या सहकाऱ्यांना समज देणं हे सर्व आजच्या शासनव्यवस्थेत अनुकरणीय ठरेल. "सत्ता ही सेवा आहे" हे त्यांचं ब्रीद आजच्या प्रत्येक राजकीय नेत्याने आचरणात आणण्यासारखं आहे. स्त्रियांसाठी त्यांनी उभे केलेलं आदर्श, त्यांच्या शिक्षणासाठी दिलेली प्रेरणा, आत्मनिर्भरतेचा संदेश हे सर्व आजही सामाजिक संस्थांसाठी मार्गदर्शक ठरू शकतं. अहिल्याबाई होळकर हे नाव म्हणजे एका स्त्रीने समाज, धर्म, आणि शासन यांना एकत्र आणून सत्त्वशीलतेने उभं केलेलं यशस्वी उदाहरण. त्यांच्या जीवनाने आपल्याला शिकवले परिस्थिती कितीही प्रतिकूल असो, मनाच्या दृढतेने, विवेकाने आणि निष्ठेने इतिहास घडवता येतो. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# शुध्दज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

जसे रात्री नंतर दिवस उगवतो अंधार नाहीसा होतो. तसेच एका मूळ स्वरूपातून हे सारे विश्व व्यक्त दशेला येते व पून्हा त्याच स्वरूपात लय पावते. त्या आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले की अज्ञान नाहीसे होते. आपण बांधले गेलो आहोत असा अज्ञानातून होणारा भ्रम नाहीसा होतो. आपण विश्वापेक्षादेखील विशाल असताना स्थळ काळांनी वेढल्यामुळे जणूकाय बद्ध आहोत. ते विश्वच मुळीस्वरूपात लीन झाल्याने आत्मज्ञानी पुरूशालाबद्ध पणाची भावना उरत नाही

आत्मज्ञान झाल्यावर हा सगळा विरोध मावळतो. आत्मस्वरूप अनत असल्याने ज्याला ज्या पद्धतीने विषय समजला आहे, तो त्या प्रमाणे मथ मांडतो

आत्मज्ञी पुरूषाच्या अनुभव सर्व समावेशक असल्याने त

याच्या मताला व्यापक व खोलवर विचार विचार केला पाहिजे.

वेदान्ताच्या मते शुद्धज्ञान कसे असते?


अज्ञानाचा मल नसलेले अगदी शुद्ध आत्मस्वरूप या द्रुष्य चराचरांचें मूळ आहे असा प्रत्यक्ष अनुभव येऊन जे ज्ञान होते त्यास वेदान्यांमध्ये शुद्धज्ञान असे म्हणतत.

"मोक्ष देणारे ब्रम्हज्ञान"

आपण आपल्या मूळ स्थानाचा म्हणजे स्वरूपाचा शोध केला तर आपण स्वस्वरूपाचा शोध केला तर आपण आत्मस्वरूपात जातोसते स्वस्वरूप ज्ञानमय असल्याने तेथे अज्ञान आपोआपच नाहीसे होते म्हणून आत्म्याला मोक्ष देणारे ब्रम्हज्ञान असे म्हणतात.

" मी कोण आहे ?

हे जाणण्याचा हेतु बाळगून जर आपण शोध घेऊं लागलो तर खर मी देहाच्या पलीकडे आहे असा अनुभव येऊ लागतो



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नाम कुठवर घ्यावे ?

ज्योतिर्मय साहित्य

नाम कुठवर घ्यावे ? आपला श्वासोच्छ्वास चालू आहे, किंवा स्वत:ची स्मृती आहे, तिथपर्यंत नाम घ्यावे. आपण श्वासोच्छ्वास जसा मरेपर्यंत घेतो, तसेच नामाचे आहे. बरोबर भाषेत बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, श्वासोच्छ्वास थांबला म्हणजे मरण येते, त्याचप्रमाणे नामाशिवाय जगणे हे मेल्यासारखेच आहे, असे वाटले पाहिजे. अक्षरश: जीव जाईपर्यंत, म्हणजे मीपणाने मरेपर्यंत नाम घेत सुटावे. शेवटी ' मी ' जातो आणि नाम शिल्लकच उरते. नाम घेऊन कधी पुरे होऊ शकत नाही. मुक्ती मिळाली की सर्व पुरे झाले असे म्हणतात, पण मुक्तीनंतरही जर काही कर्तव्य उरत असेल तर ते नामस्मरणच.

माणसाला गुंगीचे औषध दिले म्हणजे त्याला गुंगी आली की नाही हे पाहण्यासाठी अंक मोजायला सांगतात. अंक मोजता मोजता तो थांबला की, तो देहभानावर नाही असे ठरते. तसे, नाम घेता घेता 'मी नाम घेतो' हेही स्मरण जेव्हा राहात नाही, तेव्हाच त्या नामात रंगून गेलेल्या माणसाचे पर्यवसान 'एकान्तात' होते. एकान्त म्हणजे नाम घेणारा मी एक, ह्या एकाचाही अंत होणे, म्हणजेच देहबुद्धीचा विसर पडणे, देहबुद्धीच्या पलीकडे जाणे. नाम घेता घेता अशी स्थिती प्राप्त झाली, म्हणजे त्याचे चित्त भगवंताकडे आहे की नाही असा प्रश्न करायला वावच कुठे राहतो? निद्रानाशाचा रोग झाला तर झोप लागेपर्यंत झोपेचे औषध आपण घेतो, तसे आपल्याला स्वाभाविक समाधान मिळेपर्यंत आपण नाम घेतले पाहिजे. नाम उपाधिरहित असल्याने आपणही उपाधिरहित झाल्याशिवाय नामाचे प्रेम आपल्याला येणार नाही. नामाने आनंदमय अशा भगवंताचे सान्निध्य लाभून त्याची कृपा व्हायला वेळ लागत नाही; किंबहुना, ज्याच्यावर भगवंताची कृपा होते त्याच्याच मुखात नाम येते.

नामजपाची संख्या नोंद करून ठेवावी का ? अमुक एक संख्येपर्यंत जप करण्याचा संकल्प केला असेल, किंवा रोजचा काही कमीत कमी जप करण्याचे ठरविले असेल, तर जपसंख्येची नोंद करून ठेवणे जरूर आहे. जपाची सवय होण्याच्या दृष्टीने, आणि नेमाने काहीतरी किमान जप झाल्याशिवाय दिवस जाऊ नये या दृष्टीनेही, जपसंख्येची नोंद करावी. मात्र असे करताना एका बाबतीत खबरदारी घ्यावी; ती म्हणजे, आपली आजची नामसंख्या पुरी झाली, आता उद्यापर्यंत आपला आणि नामाचा काही संबंध नाही, अशा तऱ्हेची वृत्ती होण्याचा संभव असतो, त्याला जपावे; आणि नेमाची संख्या पुरी झाली तरी होईल तेवढे आणखी नाम घेण्याची सवय ठेवावी.

३. साध्या माणसाने विशेष खोलात न शिरता, सांगितल्याप्रमाणे नाम घ्यावे. त्याचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही.

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचा अभंग (भाग तीन)

ज्योतिर्मय साहित्य

२ रा प्रयोग : साक्षीभावाने राहणे

साक्षी भावाने (अवचेतन मनाने) राहणे म्हणजे नियंत्रित होणे हा हा प्रयोग आहे. आपले बाह्यमन कितीही उड्या मारो, त्याकडे केवळ साक्षी भावाने पहायचे. असे करत गेले की मन हे तादात्म्य पावते. समजा डोके दुखते तर मनास वाटते आपलेच दुखते हा तादात्म भाव कमी करणे.

राग काढणे किंवा दमण करणे सोपे असते हे बाह्यमनाच्या नियंत्रणाने होते पण साक्षी भावाने राहणारे मन हे अभिव्यक्त ही करत नाही

हा हा प्रयोग आहे. घडणाऱ्या प्रसंगाला त्रयस्थ नजरेने पाहायचे. याला साक्षी भाव असे म्हणतात.

मीच मग राखण झालो हे राखण करणारे तिसरे मन अंतर मन वेगळे आहे राग काढणे किंवा दमण करणे सोपे असते ही बाह्यमनाच्या नियंत्रणाने होते पण साक्षीभावाने राहणारे मन हे अभिव्यक्तही करीत नाही. तुकाराम महाराज यांना जेव्हा त्यांच्या बायकोने ऊसाने मारले तेव्हा, त्यांना तिचा राग आला नाही. तो त्यांनी व्यक्तही केला नाही, आणि दमन ही केला नाही. तर त्यांनी या घटनेकडे केवळ साक्षी भावाने पाहिले. हा देह मला वापरण्यासाठी दिला आहे पण तो देह म्हणजे मी नव्हे.या देहास येणारा सुख दुःखाचा अनुभव हा त्रयस्थ नजरेने पाहणे यालाच साक्षी भाव म्हणतात.

३ रा प्रयोग : राग आल्यावर आरशासमोर उभे रहा* व कल्पना करा की, आरशातील प्रतिमा म्हणजेच आपणास ज्याचा राग आला ती व्यक्ती आहे. आता राग व्यक्त करा. राग कमी होईल. मग हसू येईल. मग लक्षात येईल, रागात असताना देखील, मनाचे एक केंद्र असे होते की, जे शांत होते.

४था प्रयोग : आरशासमोरील प्रयोग पुन्हा काही वेळानंतर पुन्हा पुन्हा आठवणे मनावर झालेले घाव आशा क्रोध करून संपवता येतात.

५ वा प्रयोग : सामूहिक हास्य करणे घरातील कोणी व्यक्ती रागात आली की इतर सर्वांनी सामूहिक हास्य करावे. हळूहळू राग शांत होईल.

६वा प्रयोग : केवळ मनाने विकार उपभोगून घ्या व साक्षी भावनेने हे म्हणून नाट्य तपासून घ्या हळूहळू विकार कमी होतील थोड्या थोड्या गोष्टीने जर तुम्हाला राग येत असेल तर ,तुम्ही बाह्य वस्तू व्यक्तीच्या हातातील खेळण्यात तुम्ही प्रतिक्रियावादी झालात. काहीतरी होते त्याची प्रतिक्रिया तुम्ही लगेच देता. क्रिया नाहीच केवळ प्रतिक्रिया होते. संताच्या क्रिया असतात प्रतिक्रिया नाहीत.

७वा प्रयोग : तुमची चेतना बाहेर जास्त वाहते. असे सतत करत गेल्यास तुमची किरणे नष्ट होतात. तुम्ही रिक्त होता. म्हणून तुमची अंतरमुखी चेतना वाढली पाहिजे. प्राणप्रवाह उर्ध्व झाला पाहिजे. नऊ द्वारातून बाहेर वाहणारी चेतना आत वळली पाहिजे. *ध्यान केल्याने बाहेर जाणारी चेतना परत आत घेता येते.

मनाचे चार खंड आहेत जागृती स्वप्न सुशुप्ती आणि तूर्या मनाला तूर्येत ठेवा मन थकूच देऊ नका शरीर थकू द्या.

८ वा प्रयोग : सूक्ष्म शरीरावर ध्यान करा व त्यातून निळा प्रकाश बाहेर येतो अशी कल्पना करा. मनाच्या शक्ती विखुरलेल्या असतात. अनेक विषयावर मन फिरत राहते. मनात चंचलत्व असते व त्याच्या शक्ती विखुरल्या जातात. मन केंद्रित करा. एकाग्रते कडून समाधीकडे जाण्यासाठी मन प्रसन्न हवे. साधकाला मनाची एकाग्रता करता यायलाच पाहिजे. एक काम एक विचार. *भूतकाळ व भविष्यकाळात न जाता मन हे वर्तमान काळातच ठेवता यायला हवे.

व्यक्ती विषय व वस्तू याविषयीची अनुकूलता म्हणजे संसारीक सिद्धी. यशस्वी होण्याचे गमक म्हणजे संकटातही प्रसन्न राहणे. प्रसन्न मनात प्रभु चेतना आकार घेते. म्हणून "तू हे मन मी ची करी"अशी ओवी आहे. भगवंताचे मन प्रसन्न असते, त्याप्रमाणे आपलेही मन प्रसन्न करा. असेच सांगितल्या जाते.

मनावर येणारा ताण कसा कमी करायचा याचे अध्यात्मिक आणि वैज्ञानिक प्रयोग आज आपण पाहिले अभंगाचा उत्तरार्ध पुढील भागात आपण पाहूयात.



## ॥ निरूपण ॥

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

४१. विनवणी

विनवितो माये तुला। जोडोनिया दोहो कर।
स्वीकारावे उपहार। शब्दमोतियांचे हार।।
आकाशी फिरते घार। पिलापाशी लक्ष फार।
विठोबाची भक्त थोर। जना सांगे गोष्टी चार।।
माये लक्ष माझेवर। घेई मज कडेवर।
हळु घालिते फुंकर। ठेवी हात डोईवर।।
कोणी फुंकिती घागर। उन्मनी भक्तीसागर।
ऐसे मायेचे अंतर। फणसाचा मऊ गर।।
अंबाबाई नाम थोर। उच्चारे स्मरती घोर।
धरिला भक्तीचा दोर। चंद्रहास तिचे पोर।।

४२. श्वास माय स्वये झाली।।

पुण्य माझे फळा आले। माताराणी घरी आली।
जीवन नौरात्र झाले। श्वास माय स्वये झाली।।
सारे काही रे जिंकिले। अंबा माय स्वप्नी आली।
वंदिली तिची पाऊले। हात फिरविते गाली।।
हासणे तिचे पाहता। दिसे श्वेत दन्तावली।
ओठांची गुलाबी छटा। सहस्र कमळे लाजली।।
चंद्रहास म्हणे माते। सवे खेळतो पावली।
फेर धरूनी नाचते। संगे जगाची माऊली।।





# पायी चाला अन् हृदय निरोगी ठेवा

ज्योतिर्मय साहित्य

वॉक करणं म्हणजे पायी चालणं ही फीट राहण्यासाठी आणि निरोगी राहण्यासाठी सगळ्यात चांगली एक्सरसाईज मानली जाते. पायी चालणं ही सगळ्यात सोपी आणि फायदेशीर एक्सरसाईज आहे. वजन कमी करण्यासाठी किंवा हृदय निरोगी ठेवण्यासाठी किती पायी चालावं यावर वेगवेगळे रिसर्च नेहमीच समोर येत असतात. अशात आता आणखी एक रिसर्च समोर आला आहे.

ब्रिटिश जर्नल ऑफ स्पोर्ट्स मेडिसिनमध्ये प्रकाशित लेखानुसार, संशोधकांनी सांगितलं की, रोज केवळ ११ मिनिटे म्हणजे आठवड्यातून ७५ मिनिटे ब्रिस्क वॉक केल्याने म्हणजे वेगाने पायी चालल्याने हार्ट स्ट्रोक आणि कॅन्सरसारख्या आजारांचा धोका कमी केला जाऊ शकतो. हा रिसर्च जवळपास ३० मिलियन लोकांवर करण्यात आला होता.

काय सांगतो रिसर्च?

रिसर्चमध्ये असं आढळून आलं की, रोज केवळ ११ मिनिटे वॉक करूनही तुम्ही कार्डिओवस्कुलर डिजीजचा धोका १७ टक्क्यांनी कमी होतो आणि कॅन्सरचा धोका ७ टक्क्यांनी कमी होतो. अभ्यासकांना आढळलं की, याने ६ पैकी एक अकाली मृत्यूपासूनही बचाव केला जाऊ शकतो. तसेच या रिसर्चमधून हे स्पष्ट झालं की, आपल्या छोट्या छोट्या अनहेल्दी सवयी सुधारून आपण आरोग्यासंबंधी अनेक समस्या दूर करू शकतो. अशात जाणून घेऊ पायी चालण्याचे काही फायदे.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

वॉक करण्याचे फायदे

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थनुसार, रोज वॉक केल्याने स्ट्रेस लेव्हल कमी होतो, ब्लड प्रेशर कंट्रोल राहतं, स्ट्रोकचा धोका कमी होतो, कार्डिओवस्कुलर हेल्थही चांगलं राहतं, झोप चांगली येते, हाडे मजबूत राहतात, लठ्ठपणा दूर होतो आणि डायबिटीसही कंट्रोल राहतो.

पायी चालल्याने कलात्मक विचार वाढतात आणि तुम्हाला अनेक अवघड समस्यांमधून बाहेर पडण्यासही मदत मिळते.

रोज किमान ११ मिनिटे वॉक केल्याने तुम्हाला एक्स्ट्रा कॅलरी बर्न करण्यास मदत मिळते.

जर तुम्ही रोज काही तास एक्सरसाईज करू शकत नसाल तर तुम्ही रोज किमान ११ मिनिटे पायी चालू शकता. नुसार, रोज ११ मिनिटे वेगाने पायी चालण्याने तुम्हाला अनेक फायदे मिळू शकतात.

रोज ११ मिनिटे पायी चालणं तुमच्या गुडघ्यांसाठीही फायदेशीर ठरतं. सकाळी नियमितपणे पायी चालल्याने तुमचं एखादं जुनं दुखणंही दूर होतं आणि जॉईंट्सच्या समस्या दूर करण्यासही मदत मिळते.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

हनुमान म्हणाले रामांच्या कृपेने मी हा पराक्रम करू शकतो तर प्रत्यक्ष राम हे का नाही करू शकणार. वाणारानी हनुमंताने सीता माता सापडल्या ही आनंद वार्ता सांगितली आ इ सर्व वाणारानी जल्लोष केला त्यांनी आनंदात सुवर्णाचे उपवन धिंगाणा घालून खराब केले.तेथील सेवक त्यांना राम म्हणतात सीतेचा शोध लागला पण ती समुद्राच्या पलीकडे आहे. हा समुद्र कसा ओलांडायचा. ही चिंता करू लागले. सुग्रीवने आपण कांहीं करू शकतो हनुमा आहे.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

ज्याचा सेवक इतका विध्वंस करू शकतो तो स्वतः आला तर तो काय करू शकतो? रावणाने सभा घेतली बहुतांश सभासद हो बरोबर आहे असाच सल्ला दिला. तुम्ही सीतेला पळवून आणली आहेतच ना. तुम्हाला तिच्याशी लग्न करायचे आहे ना. मग ते योग्य व अयोग्य ही आम्ही पाहणार नाही आम्ही तुमच्या मागे उभे आहोत. एका घटनेवरून आपण घाबरण्याचे कांहीं कारण नाही असे इद्रजित याने सांगितले इतर सरदार प्रगत वगैरे म्हणाले. मग बिभीषण हे मंत्री म्हणाले.

तुम्ही रामाची पत्नी पळवून आणण्याचे कांहीं कारण नव्हते. तुमच्या एकट्याच्या मनात काम उत्पन्न झाला आणि त्याचे फळ सर्व राक्षसांना भोगावे लागेल. तुम्ही कपटाने सीतेला पळवून आणले. आपला विवेक आपण जागवायला पाहिजे. तुम्ही अधर्म केला आहे.

**(क्रमशः)**

## फुलमाला....



ट्युलिपचे फूल..

अनेक रंगात आकर्षक दिसणारे
ट्यूलिपचे फूल जगी पहिल्या नंबरवर
काश्मीरमध्ये त्याची बाग मोठी
घालते काश्मिरी सौंदर्यात भर

हे मोहक फुल निष्ठेचे प्रतीक आहे
याला परदेशात आहे खूप मागणी
प्रसन्न आणि हे ताजेतवाने राहते
याचे दुसरे नाव आहे रात्रीची राणी

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज

# सकारात्मकता विचारांची आनंदी देणं

ज्योतिर्मय साहित्य

मानवी मन इतकं अजब रसायन आहे की त्यात नित्य अनेक विचार येत असतात. त्यात काही सकारात्मक तर नकारात्मक असतात. मानवी मनात नित्य असंख्य विचार येत असले तरी त्यात नकारात्मक जास्त प्रमाणात असतात. नकारात्मक विचारांना सकारात्मक करणे गरजेचे असते. कारण नकारात्मक मन हे मानवी जीवनाला आणखी अडचणीत नेते. म्हणून सकारात्मक विचार करणे अत्यंत गरजेचे असते.

आपल्या मनाची सकारात्मक शक्ती, आपला आत्मविश्वास वाढवू शकते. उत्साह निर्माण करू शकते, कार्याची दिशा बदलून दुसऱ्या मार्गाने कार्यपूर्तीचा, ध्येय प्राप्तीचा आनंद मिळू शकतो. नकारात्मक विचारांना सकारात्मक करणे म्हणजे मनाचेच मनाशी युध्द करणे होय. यालाच संत तुकाराम महाराज म्हणत ‘‘रात्रं दिनं आम्हां युद्धाचा प्रसंग’’! येथे रात्रंदिन मन नकारात्मक भावना विचार मनी येतात, असा भाव अभिप्रेत आहे. यामुळे मानसिक आणि पर्यायाने माणसाची शारीरिक स्थिती बिघडू शकते. म्हणून सकारात्मक राहणे उचित ठरते.

आपल्या सर्वांना माहित आहे विजेच्या दिव्याचा शोध थॉमस् अल्वा एडिसनने लावला. हा शोध लावताना त्याने ९९९ प्रयोग केले. सर्व अयशस्वी झाले पण हजाराव्या प्रयोगाच्या वेळेला विजेचा दिवा लागला. आणि या विश्वाला रात्रीच्या अंधारापासून कायमची मुक्ती मिळाली.

थॉमसला ज्यावेळेस पत्रकारांनी मुलाखतीत विचारलं. थॉमस तुमचे ९९९ प्रयोग फसले याबाबत तुला काय वाटले ? थॉमस एडिसन म्हणाले, ९९९ प्रयोग फसले असे म्हणू नका. ९९९ वेळा मी हे सिध्द केलं, या मार्गाने विजेचा दिवा लागू शकत नाही. (सकारात्मक दृष्टीकोन) म्हणजे मला शोध लावायचा मार्ग बदलावा लागेल. मी त्यात थोडा बदल केला आणि पुन्हा प्रयत्न केला तेंव्हा हा दिवा लागला.

एकदा नेपोलियन, समुद्र किनाऱ्यावर सैन्या समोर जहाजातून उतरताना पाय चिखलावर घसरून छातीवर आडवा पडला, छाती चिखलाने माखली. तेव्हा अंधश्रध्दाळू सैनिकांना वाटले, आपला सेनापती आडवा झाला म्हणजे आज आपला पराभव होणार, आपली मुंडकीउडणार,सर्व सैनिक भयभीत झाले. नेपोलियनने ही बाब लगेच हेरली.

तो पटकन उठला आणि उठताना छाती झटकत म्हणाला, ‘मित्रांनो आजचे युध्द आपणच जिंकणार, जिथे जिथे आपण जाऊ तेथे - तेथे आपला विजय होणार’ कारण आपण आल्या आल्या या भूमीने मला अलिंगन दिले आहे -

**मी तुझी आहे,**
**मी तुझी आहे....**
असे म्हणत.

खरंच त्या प्रसंगी किती छान ही सकारात्मक पद्धत.आणि पुढे त्याच्या सैनिकांचे मनोबल वाढले व सगळीकडे मोठी विजयश्री त्यांनी खेचूनआणली, हे घडलं सकारात्मक दृष्टीकोनामुळे आणि त्या दिशेने केलेल्या कार्यामुळे. टेबलावर एक ग्लास पाण्याने अर्धा रिकामा आहे असा विचार करण्यापेक्षा पेक्षा जर असा विचार केला की, अर्धा भरला आहे त्यामुळे मन समाधानी होतं.

सकारात्मक दृष्टीकोन मनाला प्रसन्न



करून अतिरिक्त ऊर्जा प्रदान करतो त्यामुळे कर्माला गती प्राप्त होते आणि आत्मविश्वास वाढतो.नकारात्मक विचार मनाला व शरीराला दुर्बल करतो. परिणामी कर्माची गती मंदावते आपल्या कडून चुका होतात, हानी होते व

सगुण- निर्गुण




गिरीश वसेकर( देशपांडे)
नांदेड सिटी,पुणे ९४२२६५९४००


यातूनच नैराश्य येते.

एकदा भगवान गौतम बुध्दाजवळ एक शिष्य धापा टाकत आला व म्हणाला भगवान ‘‘मला गावकऱ्यांनी शिवी दिली.’’ भगवान बुध्द म्हणाले ‘‘बरं झालं त्यांनी तुला मारलं नाही.’’ तो म्हणाला ‘‘भगवान नंतर त्यांनी मला मारलं सुध्दा’’ तेंव्हा भगवान म्हणाले ‘‘या मारामुळे तुला काही जखम झाली का ?’’ शिष्य म्हणाला ‘‘भगवान माझं डोकं फुटलं आहे.’’ तेंव्हा भगवान गौतम बुध्द म्हणाले ‘‘बरं झालं - तुझा मृत्यू झाला नाही.’’ हे ऐकून शिष्य शांतपणे बुध्दाच्या चरणाजवळ शांत बसला. भगवान बुध्दांना हेच सांगायचे होते की, जी घटना घडली त्यापेक्षा वाईट घटना घडू शकली असती पण ती घडली नाही हे यामुळे समाधानी राहणे गरजेचे असते.

एकदा एका जोरात आलेल्या वादळाने चिमणीची घरटे तुटून पडले. चिमणा बाहेर गेला होता.तो आपल्या घरट्याकडे येताच, घरटे नष्ट झाल्याचे दिसले. चिमणी झाडावरच अश्रू गाळत बसल्याची त्याला दिसली.

तो चिमणीला म्हणाला,अगं चिमणे तू अश्रू का गाळते आहेस? तेंव्हा चिमणी म्हणाली. आपण कष्टाने बांधलेले घरटे वादळाने एका क्षणात नष्ट केले आपली पिलां आता जन्म घेतील त्याचं आता कसं व्हावं? तेंव्हा चिमणा म्हणाला,वादळाचे कामच आहे नष्ट करायचे. मग आपण का मनाने हरायचे. मला,तुला चोच आहे.आपण उडू शकतो.इकडे तिकडे जमिनीवर काड्या पडलेल्याआहेत,गवत ही आहे. मग आपण हे सारं पुन्हा आणूनपुन्हा नवं घरटं बांधू शकतो ना?मग का हरायचे? हे ऐकल्यावर चिमणीला ही थोडे बरे वाटले आणि दोघे लगेच कामाला लागली. काड्या,गवत आदी गोष्टी घेऊन घरटं पुन्हा नव्याने तयार केले. आणि चिमणा म्हणाला, आपल्या पिलांना आता नवीन घरटं मिळेल. वाह,किती ही छान सकारात्मकता? आपण कधी जेव्हा अस्वस्थ असतो तेंव्हा मी अस्वस्थ आहे, पण काही लोकं माझ्यापेक्षा जास्त अस्वस्थ आहेत असा विचार मनाची तात्कालीक अस्वस्थता बऱ्याच प्रमाणात कमी करू शकते. माजी राष्ट्रपती स्व.अब्दुल कलामांना नौदलात भरती होता न आल्यामुळे पुढे ते शास्त्रज्ञ व देशाचे राष्ट्रपती झाले. काही वेळा अपयश हे महान यशाचे पण सूचक असते. म्हणून सकारात्मक विचार करा व आनंदी रहा हाच विचार जगण्याला आणखी सुंदर बनवू शकतो.म्हणून नेहमी सकारात्मक असावं. जुनी लोक सांगतात बाहेर जाताना आपण येतो म्हणावे,जातो म्हणू नये. येथे येतो हा सकारात्मक भावआहे.तेथील वास्तू ही मगआपल्याला तेथे पुन्हा आनंदानेबोलावते, अश्या त्या मागच्या भावना आहेत. आपण जर सकारात्मक पद्धतीने बोलत राहिलो, त्या दृष्टीनी कार्य करत राहिलो तर हळूहळू घरात ही सकारात्मक घटना घडत असतात कोण म्हणतं जीवनात प्रत्येक वेळी काटेरी डंखच असतात? नीट डोळे उघडून बघितले तर मनाला उडण्यासाठी फुलपाखरासारखे पंख ही असतात. फक्त गरज असते ती सकारात्मक पद्धतीने जीवनाकडे बघण्याची.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

## मैत्रीपर्व : गुरुदेव आणि महात्मा गांधी

गुरुदेव आणि महात्माजी यांच्यामध्ये काही बाबतीत मतभेद होते परंतु या महापुरुषांनी आपले मनभेद त्यामुळे कधीही होऊ दिले नाहीत. केवळ चरखा चालवून आणि सूत कातून शेतकरी स्वावलंबी होणार नाहीत आणि स्वराज्य मिळणार नाही. समोर कुठलातरी विधायक कार्यक्रम असल्याशिवाय शाळा कॉलेजवर तरुणांनी सरसकट बहिष्कार टाकू नये. नंतरच त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत उतरावे नाहीतर ते विध्वंसक बनतील असे गुरुदेवांचे मत होते. १९२२ च्या आंदोलनात सत्याग्रही हिंसक झाले आणि त्यांनी चौरीचौरा येथे एक पोलीस चौकी जाळली आणि गुरुदेवांच्या या विचारांचे प्रत्यंतर आले. अर्थातच गांधीजी सुद्धा या गोष्टीमुळे व्यथित झाले आणि त्यांनी हे आंदोलन मागे घेतले.

गांधीजी जेव्हा जेव्हा उपोषणाला बसत तेव्हा त्यांच्या प्रकृतीचा विचार मनात येऊन गुरुदेव काळजीत पडत. पुण्यात जेव्हा येरवड्याच्या तुरुंगात गांधीजींनी जेव्हा उपोषण सुरू केले तेव्हा त्यांची काळजी वाटून त्यावेळी ७२ वर्षे वय असलेले गुरुदेव त्यांच्या भेटीसाठी धावून गेले. यावेळी गांधीजींनाही त्यांचीच आठवण येत होती. आणि गांधीजींच्या मनात त्यांच्या कवितेच्या ओळी घोळत होत्या.

जीबॉन जॉखॉय शुकाये जाय
कोरूणाधाराय एशो
शकल माधुरी लुकाये जाय
गीतोसुधारशे एशो.

(जीवन जेव्हा सुकुनि जाते करुणाधारा होऊनि ये सकल माधुरी लोपून जाता गीत सुधारस होऊनि ये )

गुरुदेवांच्या कवितेतील हे धीर देणारे शब्द त्यावेळी गांधीजींनाही जणू धीर देत होते. गांधीजींनी त्याही अवस्थेत गुरुदेवांना हे गीत म्हणण्याची विनंती केली आणि त्या ७२ वर्षांच्या वृद्ध कवीने त्यांचे हे म्हणणे लगेच मान्य केले.

गुरुदेव आणि महात्माजी हे दोन्हीही भारतमातेचे थोर सुपुत्र. त्या दोघांच्या विचारसरणीत काही बाबतीत किरकोळ मतभेद असले तरी त्या दोघांमध्ये समानतेचा एक मोठा धागा होता आणि तो म्हणजे सर्वसामान्य भारतीय माणसाबद्दल त्यांना वाटणारी आत्मीयता. तशी दोघांचीही कार्यक्षेत्रे वेगळी होती. राजकारण हे गांधीजींचे कार्यक्षेत्र तर साहित्य आणि संस्कृती हा गुरुदेवांचा प्रांत. पण आपल्याला कोणते कार्य करायचे आहे याबाबत दोघांच्याही विचारांमध्ये स्पष्टता होती. मार्ग वेगवेगळे असले तरी मातृभूमीच्या उद्धारासाठी आणि विकासासाठी दोघेही झटत होते.

(क्रमशः)


# आदिवासी साहित्यवृक्षास लागलेलं सुवर्णफळ- पारवा

ज्योतिर्मय साहित्य

आई, तू नाहीस म्हणून सारं हरवल्या हरवल्यासारखं वाटतं. प्रमोद बोरसरे या आदिवासीबहुल क्षेत्रातील साहित्यिकानं फोडलेला हा टाहो त्याच्या पारवा या कथासंग्रहाचंच नव्हे, तर त्याच्या अवघ्या भावविश्वाचं सार आहे.

गडचिरोली चंद्रपूर या जिल्ह्यातील आदिवासींच्या जिवनमृत्यूचं रणकंदन ज्यात रेखाटलेलं आहे असा पारवा माझ्या आदिवासीबहुल क्षेत्रातील साहित्यिक मित्र प्रमोद बोरसरे यांचा आहे, याचा मला अभिमान आहे.

जगण्याची उमेद पायात आणि मरणाचं भय डोक्यावर घेवून जगणाऱ्या, उघड्या नागड्या रानवाटेतील बोचऱ्या वेलींनी आणि काटेरी झुडूपांनीही निर्दयी बुटांच्या टाचेखाली चिरडून जावं, आणि जगासाठी सुगंध उगाळणाऱ्या रक्तचंदनांनीही बंदूकीच्या दहशतीत रक्ताळलेले उसासे टाकावेत, चंद्राच्या शितल प्रकाशानेही भयानक बेसूर चित्र रेखाटावेत, दरेक दिवशी हिरवळीऐवजी क्रौर्य् घेऊन उगवणारे बंदूकवृक्ष, आणि या वृक्षास मधूर फळांऐवजी लागणारी बाम्बसदृष्य फळे, रानकाजव्यांच्या लुकलुकणाऱ्या प्रकाशाऐवजी छातीचा वेध घेणारी बंदूकीची चिनगारी, आणि रातकिड्यांच्या मनोवेधक किर्रकिर्र आवाजाऐवजी येणारी एखाद्याची कर्णकर्कश हृदयभेदी किंकाळी, पौर्णिमेच्या लख्ख प्रकाशाऐवजी अमावश्येची काळीकुट्ट भिती मनात साठवलेली उघडी नागडी व्यक्तीचित्रणं. खोट्या चांदीचा मुलायम लेप लावून सांत्वनासाठी येणारे शुभ्र वस्त्राखाली लपलेले काळेशार कपटी देह आणि शुभ्र टोपीखाली दडलेली अविचारी निर्दयी डोकी, बेजुबान कर्तृत्वाची कठोर भाषा बोलणारी खाकी टोपी, व क्रांतीचा लाल सलाम करायला लावणाऱ्या बंदूकीच्या गोळीपेक्षा जहाल दंडूकेशाही यांचे यथार्थ चित्रण असलेली व स्वातंत्र्याचा जिथे मागमुसही नाही, अशा दारुण परिस्थतीचं बेसूर आणि भेसूर चित्र रेखाटणारी कलाकृती, हेच तर यशाचं गमक आहे पारवा या कथासंग्रहाचं.





समीक्षण...



चुडाराम बल्हारपुरे, बंगरुळू
भ्रमणध्वनी-९६२३६६३४३५

क्रांतीची बात करणं, हे तर सोम्यागोम्यालाही जमेल. कारण त्याला फार श्रम करावे लागत नाहीत. विध्वंसरुपी माणसविरुध्द बंड उभारण्याची भाषा बोलणं हे वाफाळलेल्या चहाचा घोट घेण्याइतपत सोपं आहे. पण दहशतीतून जगण्याचा वेध घेणे, अजान लेकरांची अबोल क्रांती नाजूक मोरपिसांनी रेखाटणे,हे त्यालाच जमतं, ज्यानं ते अनुभवले आहे. आणि रानपाखरांच्या थव्यामागोमाग पारव्यासारखं फिरुन, स्वत:च्या फडफडणाऱ्या पंखांचेही बलिदान करुन त्यातील निर्जीव दगडधोंड्यांच्या, आणि काळ्याशार कातडांच्या अस्तित्वाचा शोध घेणाऱ्या, आणि स्वच्छंदी खळखळणाऱ्या ओढ्यातील जलतरंगांचा सुमधूर आवाज आपल्या चाणाक्ष कर्णरंध्रांनी टिपून ते कलमबद्ध करणाऱ्या प्रमोद बोरसरे या आदिवासीबहुल भागातील लेखकाच्या पारवा या कथासंग्रहाची दुसरी आवृत्ती ‘‘मॅजेस्टिक‘‘ प्रकाशनाने प्रकाशित करावी,या अशक्यप्राय गोष्टीला सत्याचा पुर्णविराम मिळाला आहे.

प्रमोदच्या लेखनीची एक स्वतंत्र शैली आहे. एखाद्याच्या नांगरलेल्या भुमिवर उद्दामपणे बिजांडाचा मारा करुन आयतं पिक घेणारी नाही.

नरो मोहाच्या झाडासारखा नाही, मोहाची फांदी वाकवली की तुटते. नरंगो मात्र स्वभावाने सागासारखा टणक आणि चिवट आहे हे पारवा कथेतील सत्यांश आहे.

सधन आहात तुम्ही, अंधारासारखे ही आईच्या मायेची ऊब चित्तारणारी आई ओथंब कथा वाचून आपणासही आर्त टाहो फोडावासा वाटतो - आई

कपडे बदलतात तसं मन बदलता आलं असतं, तर किती बरं झालं असतं या दुखणाऱ्या मनाची सल आपल्या मनालाही टोचणारी.

मनाला ग्लानी स्पर्शून गेली होती. आणि आता तिला खुराड्यात कधीच परतायचं नव्हतं, असं सांगणारी ग्लानी ही लघुकथा.

दहशतीच्या निबिड अरण्यातील निर्जीव शेतात पिक घेणं किती अवघड असतं ? मला आता रानात राहावसं वाटत नाही, ही खंत बोलून जातांनाच त्यानं बांसरी अलगद ओठांवर ठेवली व त्यात प्राण फुंकले, ही अवघड प्रतिभा साकारली ते प्राण या कथेत.

या व अशा अवघड प्रतिभा व प्रतिमांनी सजलेल्या व खोट्या प्रतिष्ठेचा मुखवटा न चढवलेल्या या कथासंग्रहात एकूण अठरा कथा असून अठराविश्व दारिद्र्यात खितपत पडलेल्या अनाम चेहऱ्यांचं बोलकं वर्णन करणाऱ्या आदिवासी साहित्यवृक्षास लागलेल्या या सुवर्णफळांचा आस्वाद प्रत्येक रसिक वाचकांनी नक्कीच घ्यावा, एवढी अपेक्षा.

इति लेखनमर्यादा !

पारवा (कथासंग्रह), लेखक- प्रमोद बोरसरे.


प्रकाशक- मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई

किंमत- रु. २५०/- फक्त.

***









ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# संवादाची नवी सुरुवात !

**ज्योतिर्मय साहित्य**

कधी कधी एखाद्या कथेचा पट मोठा विलक्षण असतो. तो थांबतो आणि फार मोठ्या विलंबाने पुढे सरकतो. अशीच एक कथा......

मतभेदाचं कारण बहुतेक वेळा अगदी छोटंसं असतं. संवादासाठीही एखादं निमित्त पुरेसं ठरतं. पण कधी कधी हा वाद फार लांब जातो. काळ पुढे सरकत राहतो, राहती गावं बदलतात, परंतु माणसं मात्र एकमेकांना भेटत नाहीत. घरातील बहुतांश लोकांना मनोमन असं वाटतं की, वाद नको. पण मतभेद वाढतात आणि संवाद थांबतो. चारूची आज्जी चारूला नेहमी सांगायची ''कितीही वाद झाले तरी मिटवण्याची जागा जपली पाहिजे.'' या एका वाक्याचा चारूच्या मनावर खोल परिणाम झाला होता. जेव्हा घरी वाद झाले, तेव्हा चारूचं वय दहा वर्षांचंही नव्हतं. चारूची त्यात काहीच भूमिका नव्हती. याही कथेत तसंच घडलं. पुढे सर्वांना जोडणारा दुवा अशी आज्जी गेली. पण चारूच्या मनात आजीचे शब्द कायम रेंगाळत होते.

पुढच्या वर्षी चारूचा शिक्षणासाठी पुण्याला प्रवेश झाला. गावाहून पुण्याला थेट गाडी एकच होती, पण फारशी सोयीची नव्हती. त्यामुळे चारू आधी संभाजीनगरला येई आणि मग पुण्याला जाई. गंमत म्हणजे बाकी सर्वांकडे येणं-जाणं सुरू झालं होतं, पण चारूचा एक भाऊ संभाजीनगरला होता, तिथे मात्र अजून संवाद सुरू व्हायचा होता.

एकदा चारू तब्बल दोन तास संभाजीनगर बसस्थानकावर बसची वाट पाहत होता. त्या गर्दीत त्याने भाऊवहिनी दिसतात का, म्हणून शोधलं, पण कुणीच भेटलं नाही. चारूला आजीची गोष्ट सतत आठवत होती, पण त्याच्या हातात काहीच नव्हतं. अखेर बस आली, आणि तो मनोमन अंबाबाईला प्रार्थना करीत बसमध्ये चढला ''सर्वांशी संवाद सुरू होऊ दे.''

पुण्यात शिक्षणासाठी चारू एक वर्ष राहिला. वर्षभरात नऊदा गावाला फेऱ्या झाल्या. संभाजीनगरला येणं झालं. पण आपोआप अशी भेट झाली नाही. पुढे तो नोकरीला लागला. काही वर्षांनी एका आठवड्यासाठी एक्झाम ड्युटीवर तो संभाजीनगरला होता. संध्याकाळी तो शहरभर पायी फिरत असे, पण भेट झाली नाही.

वर्षामागून वर्षे गेली. तरी एक गोष्ट मात्र ठाम राहिली चारू रोज अंबाबाईला प्रार्थना करत असे :


''आपल्या आजोबांच्या कुटुंबातील सर्वांचं कल्याण होवो. सर्वांना यश, कीर्ती, संपत्ती आणि आरोग्य लाभो.''

भौतिक प्रयत्नांपेक्षा चारूचा विश्वास नेहमी आध्यात्मिकतेवर होता.

या काळात कुठे विषय निघाला, तरी चारू कुणाबद्दलही गाऱ्हाणे करीत नसे.

चारूच्या आजोबांवर एकदा प्राजूने चारूची पत्नी हिने लेख लिहिला. तो व्हायरल झाला. त्यानंतर वैभवी, म्हणजे भावाची सून, हिचा फेसबुकवर प्राजूला मेसेज आला. तिने स्वतःचा परिचय दिला आणि तो लेख मागवला. प्राजूने चारूला विचारलं. चारू म्हणाला ''त्यांचा व्हॉट्सॲप नंबर घे आणि त्यावर लेख पाठव.''

असं करून लेख पाठवला गेला आणि



संवादाची बीजे रोवली गेली. वैभवीला यामध्ये तिच्या सासूंचा म्हणजे चारूच्या वहिनींचा आशीर्वाद होता.

तरीही संवादाची गती काहीशी मंदच होती.

काही वर्षांनी चारूला जणू अंबाबाईनेच प्रेरणा दिली. त्याने आजोबांच्या चरित्रावर आधारित कादंबरी लिहिली आणि ठरवलं हे पुस्तक सर्व कुटुंबीय, नातलग यांना पाठवायचं.

प्रश्न एवढाच होता की छत्रपती संभाजीनगरात राहणाऱ्या दादांचा पत्ता निश्चित माहित नव्हता. चारूची मैत्रीण भावाच्या नात्यातील होती. तिला विचारायचं ठरवलं होतं, किंवा प्राजूकडून वैभवीला विचारायचं होतं. पण त्याआधीच वैभवीनेच मेसेज करून पत्ता दिला. पुस्तक पोहोचवलं. त्या क्षणी चारूला जाणवलं ''आपल्या विचाराच्या गतीपेक्षाही अधिक गतीने अंबाबाई जग चालवते.''

यानंतर अंबाबाईने आणखी एक सुखद धक्का दिला. पुस्तक मिळाल्यावर चारूचा भाऊ दीपक याचा फोन आला. चारूला फारच आनंद झाला. दुसऱ्या दिवशी पार्वतीवहिनींचाही फोन आला. बराच वेळ गप्पा रंगल्या. आजोबांच्या चरित्राच्या निमित्ताने आजीची शिकवण साकार झाली. संवाद, मेसेज सुरू झाले.

दुसऱ्याच महिन्यात एका कार्यक्रमासाठी चारू सहकुटुंब संभाजीनगर जिल्ह्यात गेला होता. तेथून मित्राच्या आग्रहाने तो संभाजीनगर शहरात आला. घरी परतताना अचानक मनात आलं ''भाऊ, वहिनी, त्यांची मुलं, सुना, नातवंडं यांना न भेटता इथून जाणं बरोबर नाही.''

ड्रायव्हर विचारत होता ''सर, आता थेट जायचं ना? की अजून कुणाकडे थांबायचं आहे?''

चारूने वहिनींना फोन केला, पत्ता विचारला. वहिनीसुद्धा ''अवश्य या'' म्हणाल्या. आणि चारू थेट त्यांच्या घरी गेला. दादावहिनींना नमस्कार केला. अनेक वर्षांचे आशीर्वाद घेतले. छोट्यांना आशीर्वाद दिले.

दोघी जावा, दोघं भाऊ, कन्या गार्गी, चारूचा पुतण्या अनिल यांचा सुंदर संवाद झाला. नेमकं अनिलची पत्नी वैभवी आणि मुलगा जगत एका समारंभासाठी बाहेरगावी गेले होते. पाच दहा मिनीटं तरी भेटू म्हणणारी ही मंडळी बराच वेळ गप्पांमध्ये रंगली. संवाद अगदी सहज आणि स्वाभाविक होता.




वहिनी चारूला म्हणाल्याही, ''अहो कितीदा नमस्कार करता?''

चारू म्हणाला, ''तुमचे आशीर्वाद सदैव पाठीशी हवेत.'' आणि मनात म्हणाला, ''अनेक वर्षांचे, अनेक समारंभांचे आणि अनेक यशाच्या प्रसंगातील नमस्कार राहीले आहेत.''

त्या रात्री उशीरा घरी आल्यावर चारूने अंबाबाईला मनोमन नमस्कार केला आणि सगळा वृत्तांत सांगितला. त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून प्राजू त्याची पत्नी आणि बालमैत्रीण अंबाबाईसमोर हात जोडून म्हणाली, ''जगदंबे, माझ्या सख्याला असाच आनंद नेहमी दे.''

ते पाहून त्यांची कन्या गार्गी विचारू लागली ''आई, असं का म्हणतीयेस?''

चारू हसत म्हणाला ''बाळा, मी तुझ्यापेक्षाही लहान असताना वहिनींना पाहिलं होतं. आणि आज, अनेक वर्षांनी त्यांचे आशीर्वाद मिळाले.''

नाती ठरवून जोडता येत नाहीत. कृत्रिमपणे सांभाळताही येत नाहीत. ती प्रार्थनेनं जोडली जातात. आणि त्यासाठी कुलदेवीची कृपा नितांत आवश्यक असते.

एखादं कथानक मध्यंतरापर्यंत स्लो चालतं आणि मध्यंतरानंतर अचानक वेग घेतं, नाही का?

अनेक ठिकाणी लोक म्हणतात, बायकांमुळे विसंवाद होतो पण या कथेत चारूच्या घरात वहिनी, पत्नी आणि सून यांच्या पुढाकाराने संवाद सुरू झाला. स्त्री ही शक्तीरूपिणी आहे. अंबाबाईने या तिघींना भूमिका देऊन चारूची प्रार्थना सफल केली. दीपककडेही सर्वांना संवाद हवा होता. त्यांचीही सदिच्छा अंबाबाईने सफल केली.

***



# प्रिय सखा...श्रीकृष्ण...

**ज्योतिर्मय साहित्य**

तुझ्या जन्म क्षणापासूनचा अवघा प्रवासच अचंबित करणारा.. अगम्य.. अतर्क्य घटनांनी.. भरलेला... आणि सगळ्यांना भारुन टाकणारा... गोकुळ...नंद यशोदा, पेंद्या, गोप, गोपी.. आणि राधा यांना तुझा लाभलेला सहवास म्हणजे तुझे त्यांच्यात आणि त्यांचे तुझ्यात एकरूप होणे जितके मोहक ओढ लावणारे तितकेच आश्चर्यचकित करणारे.. त्यामुळेच असेल कदाचित किती काळ लोटला तरी इतुक्याशा प्रेम सहवासाची अखंड प्रेम ज्योत अजून मनामनात तेवत राहिलेली आहे.. त्याचे गारूड कधीही न संपणारे..

राधा... तिच्यासाठी खास असलेले तुझे बासुरी सूर, तिच्यासह गोपींच्या बरोबर कदंब तळात रंगलेली रासलीला.. शब्द, कल्पनेच्या पलीकडले. अपूर्व असे तुझे राधे वरील प्रेम. इतके की तुझ्याआधी सहज तिचे नाव ओठी येते. प्रेम म्हणजे राधा कृष्ण. इतका हळवा भावबंध परत कुठेच जोडला गेला नाही आहे. पुढे त्या प्रेम प्रवासात तुझ्या अष्ट नायिका आणि १६,१०८ पत्न्यांची भर पडली. सगळेच अनाकलनीय आणि तितकेच आदरणीय. स्त्रियांचा सन्मान जपणारे तुझे हे स्वरूप नेहमीच वंदनीय.

मीरा. तिला तिचे स्वतःचे असे प्राक्तन भोग चुकलेच नाहीत..पण तुझ्यातल्या तिच्या समर्पणामुळे ती कधीच हरली नाही..तू तिला हरू दिले नाहीस. द्रौपदी.. तीच्याबरोरचे तुझे अनमोल मैत्र.. तू किती समजून, उमजून घेऊन तिचा सन्मान जपत, तिच्या प्रत्येक खडतर वळणावर अत्यंत लक्षणीय साथ देत निभावलेस. कदाचित तुझ्यामुळेच तिला आपला जीवनदाह सोसणे सुसह्य झाले. त्यामुळेच या सुरेख बंधाचा काळावर ठसा राहिला आहे. बलराम, सुभद्रा आणि तू तुम्हां तिघा भावंडांचे पण एक समजुतीचे एकसंध वेगळे विश्व आजतागायत प्रत्येक मनात कौतुकाचे राहिले आहे. स्वतःची ही संकटे तू तितक्याच समर्थपणे पेललीस. कंसाच्या वधापासून सुरू झालेले हे चक्र महाभारतापर्यंत येऊन थांबले. किती वेगवेगळ्या घटना,नात्यांच्या बंधात न अडकता,कुठल्याही राज पदाचा मोह न बाळगता..प्रसंगी अपमान सोसूनही सत्याची, प्रेम विश्वासाची कास मात्र तू कधीच सोडली नाहीस..स्वतःला मिळालेला शाप ही सहज स्वीकारलास. अगदी यदुवंश उतरणीला लागलेला, संपत असलेला बघूनही स्थिर राहिलास.. आयुष्यातल्या अनेक रंगात




रंगून ही तुझा वेगळा रंग जपलास. म्हणूनच कदाचित तू एकमेव पूर्ण पुरुष आहेस..

युगानुयुगे तुझ्यावरील भक्ती, प्रीती, मैत्री याच्या प्रवाहात भरच पडली जात आहे..या प्रवाहातीलच मी एक आनंद, सौख्यात तुझ्यासवे फुलणारी अन् अडचणी, संकटात .. कसे काय होते आज पर्यंत मलाही उमगले नाही पण कोणत्याही रूपात तू येऊन फुंकर घालतोस. एकटी तर मी कधीच पडले नाही कारण तू माझ्या बरोबर असणार याची खात्री असते मला. जी आजपर्यंत कधीच चुकली नाही.

कोण समजू शकेल सांग आपली प्रेम मैत्री? जाणीव, नेणीवेचा हा अनुबंधच माझ्या जगण्याची ऊर्जा आहे प्रिय सख्या श्रीकृष्णा.. जो केवळ तुला कळतो....

# जगाच्या पोशिंद्याचा मित्र

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्र आणि देशभर शेतकऱ्यांचा सर्वश्रेष्ठ मित्र कोण असेल तर तो म्हणजे बैल. पूर्वीच्या काळी शेतीची सर्व कामे बैलच करीत. आता एकविसाव्या शतकात जरी यंत्राने शेतीची बहुतेक कामे होत असली तरी शेतकऱ्यांचा खरा मित्र हा बैलच असतो. आता त्याचा उपयोग काही लोक मांस (बीफ) खाण्यासाठी करतात, ही गोष्ट अलहिदा. म्हणजे लोकांची भूक भागविण्याचे कामही तो करतो. अगदी हयातभर व मरणानंतरही.

एकदा का शेतातून गाडीला बैल जुंपले की शेतकऱ्याच्या निवासस्थानापर्यंत तो अगदी आरामात त्याला नेऊन सोडत असे. त्याच्या बदल्यात शेतकऱ्याने त्याला प्रेम द्यावे हीच अपेक्षा असे. शेतीसाठी बहुउपयोगी असा हा बैल. शेतीची मशागत असू द्या किंवा शेतमाल घरी किंवा बाजारात न्यायचा असो. हा बैल अतिशय प्रामाणिक, विश्वासू असा सहकारी असे. पूर्वीच्या काळी म्हणजे विद्युत पंप येण्याआधी बैलच मोट ओढून पाणी काढत. आणि पिकांना पाणी देत.

त्याचे मल मूत्र खत म्हणून उपयोगी असे, आता शेतात कृत्रिम व रासायनिक खते घालून शेतकऱ्याने शेतीची दुर्दशा केली आहे ती गोष्ट वेगळी.



बैल अत्यंत कष्टाळू असत. शेतकरी त्यांना चाबकाने फोडून काढी तरीदेखील बैल शेतकऱ्याशी एकनिष्ठ असत. वर्षभर हा मूक प्राणी आपले काम अतिशय चोखपणे करीत असे. आता पूर्वीसारखे खंडी खंडी धान्यही पिकत नाही की ते साठवून ठेवण्याचा प्रश्न येतो. शेतकरी माल पिशवीतून घरी आणतो. अगदी हू की चूं न करता शेतकऱ्याची सर्व कामे बिनोबोभाट करणारा हा प्राणी. शेतकऱ्याला लळा लावतो. त्या बदल्यात त्याची मागणी काय तर पोटभर हिरवा चारा. आणि थोडासा खुराक. गाय दूध देते. त्या दुधावर शेतकऱ्याची मुले बाळे पोसतात. वर्षातून फक्त एकदा त्याची सेवा करायची. बैल पोळ्याला त्याचा लाड करायचा. पोळ्याच्या आधल्या दिवशी खांदे मळणी करायची. वर्षभर त्याच्या मानेवर जू ठेवून तेथ घट्टे पडतात.त्याला लोणी व हळद लावून त्याची मालिश करायची. तेवढीच त्याला विश्रांती. त्याच्या शिंगात कडबोळी घालायची. बेगडं लावायची. रंगीत ठसे उमटवायचे. गावच्या मारुती मंदिराभोवती प्रदक्षिणा घालायची वाजत गाजत घरी आणायचे. त्याला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवायचा. अगदी अल्पसमाधानी.




त्याच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवला की झालं त्याचं समाधान.

पण आता शेतकऱ्यांच्या समाधानात आनंद मानणारा हा मित्र दुरापास्त होत चालला आहे. त्याच्या पैदाशीकडं लक्ष द्यायला हवं आहे शेतकऱ्यांनी.



# शाडूमाती पासून पर्यावरण पूरक श्रीगणेश

**ज्योतिर्मय साहित्य**

**महाळूंगे,पुणे** – गुरुवार दि.२१/८/२५ रोजी शाडूमाती पासून पर्यावरण पूरक श्रीगणेश मुर्ती बनवण्याची कार्यशाळा संपन्न झाली.

मनपा शाळा महाळूंगे येथे भगवती सेवा आश्रम व जीवन कौशल्य विकास मार्फत ही कार्यशाळा घेण्यात आली..

यात डॉ.वैजनाथ देशमुख, श्रीकांत कुंभार,व्यंकट अय्यर यांनी शिल्प साकारणारे विद्यर्थ्यांना प्रशिक्षण दिले. यात सुमारे चारशेच्या वर विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे संकल्पक सर्वश्री गीरीधरभाई राठी, प्रकाशजी बोकील, डॉ.श्याम कुलकर्णी, उत्तमलाल रामधनी यांनी स्वयंसेवा केली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रभारी मु.अ. सीमा पालव, सुनिता कोतकर, विद्या कुचेकर, मनिषा भोंगळे, कविता साळूंके, राजेंद्र दिवटे, गणेश कदम या सहशिक्षकांनी बहूमोल सहकार्य केले.

# समतेचा मूळ स्रोत तथागत गौतम बुद्ध- डॉ. अनिल बैसाने
## विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राची व्याख्यानमाला

**अमरावती–** समतेचा मूळ स्रोत तथागत गौतम बुद्धच आहेत आणि संत कबीर, संत तुकाराम महाराज यांच्यावरही तथागत गौतम बुद्धाच्याच विचारांचा प्रभाव होता. एवढेच नव्हे, तर विदेशातील मोठमोठ्या ज्ञानवंतांनी जो समतेचा संदेश दिला, तो सुद्धा बुद्धाच्या विचारसणीचाच भाग आहे. मात्र, भारतातील गौतम बुद्धांच्या समतेचे रोपण विदेशात झाले आणि भारताने पुन्हा विदेशातून समतेचे रोपटे आपल्या देशात रुजवले, असे प्रतिपादन धुळे येथील व्याख्याते प्राचार्य डॉ. अनिल बैसाने यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित 'छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समतावादी दृष्टीकोन' या विषयावर ते व्याख्यान देत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलकुरू डॉ. महेंद्र ढोरे, डॉ. भैयासाहेब मेटकर, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉ. भैयासाहेब मेटकर म्हणाले, महाराष्ट्र पुरोगामी विचारांचे राज्य आहे. छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उद्देशही एकच होता. सयाजीराव गायकवाड यांनी छत्रपती शाहू महाराजांना जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विदेशात शिष्यवृत्तीमुळे शिक्षण घेत आहे, असे सांगितले, तेव्हा शाहू महाराजांनाही खूप आनंद झाला आणि त्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी मदत केली. त्यांची मुंबई येथे स्वत: भेट घेऊन कोल्हापूर संस्थानात बोलावले व जरीपटका बांधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सन्मान केला. एवढेच नाही, तर १९२० मध्ये झालेल्या अस्पृश्य परिषदेचे अध्यक्षपदही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिले, असेही डॉ. भैयासाहेब मेटकर यांनी सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, समता ही बुद्ध तत्वज्ञानातून मिळते. राजश्री शाहू महाराज खऱ्या अर्थाने चॅरिटी बीईंग ऑफ होम असे म्हणून ते उपभोगशून्य स्वामी होते, असे प्र-कुलगुरू डॉ. ढोरे म्हणाले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559